आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२८ मार्च २०२४ - गुरुवार

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. या टप्प्यात देशभरातल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे येत्या  २६ एप्रिलला मतदान होणार आहे. महाराष्ट्रात ८ जागांवर मतदान होणार आहे. या टप्प्यातल्या निवडणूकासाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात झाली असून अर्ज भरण्याची शेवटची तारीख ४ एप्रिल आहे. ८ एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील. मतदान  २६ एप्रिलला होईल.

महाराष्ट्रात यवतमाळ- वाशिम, बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, हिंगोली, नांदेड, आणि परभणी लोकसभा मतदार संघासाठी आजपासून जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज भरायला सुरुवात झाली आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणूकीच्या पहिल्या टप्प्यासाठी दाखल झालेल्या अर्जांची छाननी आज होत आहे. अर्ज दाखल करण्याचा काल अखेरचा दिवस होता. पहिल्या टप्प्यासाठी १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत रामटेकमध्ये ५१, नागपूरमध्ये ६२, भंडारा- गोंदिया ४९, गडचिरोली- चिमूर १९ आणि चंद्रपूरमध्ये ४८ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

नागपूरमधून भाजपाचे खासदार नितीन गडकरी आणि काँग्रेसचे विकास ठाकरे यांच्यात प्रमुख लढत होणार आहे. या मतदार संघात वंचित बहुजन आघाडीनं ठाकरेंना पाठिंबा जाहीर केला आहे.

गडचिरोली-चिमूर मतदारसंघात भाजपाचे खासदार अशोक नेते, तर काँग्रेसकडून नामदेव किरसान यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. भंडारा-गोंदिया मतदारसंघात भाजपचे खासदार सुनील मेंढे यांनी तर काँग्रेसकडून डॉ. प्रशांत पडोळे यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. चंद्रपूरमधून सुधीर मुनगंटीवार आणि काँग्रेसच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर यांनी अर्ज दाखल केले. रामटेकमध्ये शिवसेनेचे राजू पारवे आणि काँग्रेसच्या रश्मी बर्वे यांनी अर्ज भरले आहेत.

दरम्यान, रामटेक लोकसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार रश्मी बर्वे यांचं जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीनं अवैध ठरवलं आहे. हा काँग्रेस करता मोठा धक्का मानला जात आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय तडजोडी आणि जागावाटपासंदर्भात चर्चांना वेग आला आहे. शिवसेनेचे माजी मंत्री विजय शिवतारे यांची काल रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याबरोबर विशेष बैठक पार पडली. या संदर्भात पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका प्रसार माध्यमांसमोर विस्तृतपणे मांडणार असल्याचं शिवतारे यांनी सांगितलं आहे.

अमरावतीच्या अपक्ष खासदार नवनीत राणा यांनी काल भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं. नवनीत राणा अमरावती लोकसभा मतदारसंघातून

भाजपाच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवणार आहेत. शेतकरी कामगार पक्षाचा मेळावा काल रायगड जिल्ह्यात मुरूड इथं झाला. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहित पवार यांनी मार्गदर्शन केलं. अध्यक्षस्थानी शेकापचे जयंत पाटील होते. यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या काही प्रमुख पदाधिकाऱ्यांनी नुकताच राष्ट्रवादीत प्रवेश केला.

<><><><><>

२०१७ ते २०२१ या चार वर्षांच्या काळात काँग्रेसवर आकारण्यात आलेल्या प्राप्तीकराच्या फेरतपासणीला आव्हान देणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयानं फेटाळली आहे. न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या नेतृत्वाखालच्या पीठानं आज हा आदेश दिला. २०१४-१५ ते २०१६-२०१७ या वर्षांमधे आकारण्यात आलेल्या प्राप्तीकराची फेरतपासणी करण्याला आव्हान देणारी काँग्रेसची याचिका न्यायालयानं  गेल्याच आठवड्यात फेटाळली होती. तेच आदेश गेल्या चार वर्षांसाठीच्या याचिकांनाही लागू राहतील, असं उच्च न्यायालयानं  सांगितलं.

<><><><><>

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षांपासून सर्व विद्यापीठांनी पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केवळ  नेट स्कोअर, म्हणजेच  राष्ट्रीय पात्रता चाचणीचे गुण ग्राह्य धरावेत, असे निर्देश युजीसी, अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगानं दिले आहेत. त्यानुसार पीएचडी अभ्यासक्रमासाठी विविध

विद्यापीठं आणि उच्च शिक्षण संस्थांच्या प्रवेश परीक्षांऐवजी केवळ नेट परीक्षेचा निकाल ग्राह्य धरला जाईल.

<><><><><>

राष्ट्रीय चाचणी संस्थेनं  यावर्षी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या जेईई मुख्य परीक्षेच्या दुसऱ्या सत्राच्या अर्जदारांना परीक्षेसाठी शहर निश्चित करण्याबाबतची सूचना जारी केली आहे.

जेईई मुख्य परीक्षेचं दुसरं सत्र येत्या ४ ते १२ एप्रिल या काळात एकूण ३१९ शहरांमध्ये  आयोजित करण्यात आलं असून, यामध्ये भारताबाहेरच्या २२ शहरांचा समावेश आहे.

<><><><><>

फाल्गुन वद्य तृतीया ही छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार साजरी होणारी शिवजयंती आज विविध ठिकाणी मोठ्या उत्साहाने साजरी होत आहे. शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या किल्ले शिवनेरीवर विविध सामाजिक संस्थांनी तसंच  गड किल्ले संवर्धक मंडळांनी शिवजयंती साजरी केली. मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळावरच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तर शिवाजी पार्क इथं राज ठाकरे यांनी अभिवादन केलं.

//<><><><><>//

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२८ मार्च २०२४ - गुरुवार